CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सोमवार, ६ जानेवारी २०२५ | मुंबई | प्रहार

### कारवाईत १५० ट्रक, डम्पर, तीन जेसीबी आणि पोकलेन जप्त

# सिडकोची दमदार कारवाई; वर्षभरात १६५ जणांना अटक

◆ पनवेल (वार्ताहर):

सिडकोच्या जागेवर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज टाकणाऱ्या तसेच मातीचे उत्खनन करून त्याची चोरी करणाऱ्यांविरोधात सिडकोने गत वर्षभरात कारवाई करून ५६ गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये १६५ आरोपींना अटक करून १५०ट्रक, डम्पर व तीन जेसीबी आणि पोकलेन जप्त केले आहे.

मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. या



कामाच्या ठिकाणावरून निघणारे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज काही व्यक्तींकडून

सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जागेमध्ये तसेच त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये

अनधिकृतपणे टाकण्यात येत आहे. काही व्यक्तींकडून मातीचे उत्खनन करून त्याचीदेखील चोरी करण्यात येते.

या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम विभागाने पुढाकार घेतला आहे.

त्यानुसार सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक, अधिकारी व अभियंते, सुरक्षा अधिकारी व सुरक्षारक्षकांच्या पथकाने गत वर्षभरामध्ये मोहीम राबवून संपादित केलेल्या जागेवर डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली.

### ५६ गुन्हे दाखल

विशेष मोहिमेदरम्यान सिडकोच्या जागेवर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात विविध पोलीस ठाण्यात ५६ गुन्हे दाखल करून १६५ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये १५० ट्रक डम्पर, तीन जेसीबी, पोकलेन आदी वाहनेदेखील जप्त करण्यात आली आहे.




महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | सोमवार, ६ जानेवारी २०२५

# डेब्रिज टाकणाऱ्यांवर सिडकोची कारवाई

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

सिडकोच्या जागेवर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रिज टाकणाऱ्या तसेच नैसर्गिक मातीचे उत्खनन करून चोरी करणाऱ्यांविरोधात सिडकोने गेल्या वर्षात धडक कारवाई ५६ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच १६५ जणांना अटक करून १५० ट्रक-डंपर्स व ३ जेसीबी आणि पोकलन जप्त केले आहेत.

मुंबईसह आजूबाजुच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहे. या कामाच्या ठिकाणावरून निघणारे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रिज काही व्यक्तींकडून सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जागेमध्ये तसेच त्याच्या परिसरामध्ये अनधिकृतपणे टाकण्यात येत आहे. तसेच काही व्यक्तींकडून मातीचोरी करण्यात येते. या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक, अधिकारी व अभियंते तसेच सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षकांच्या पथकाने गत वर्षभरामध्ये विशेष मोहीम राबवून धडक कारवाई केली.

**वर्षभरात १६५ जणांवर गुन्हे**

### नागरिकांना आवाहन

सिडकोच्या परिक्षेत्रात विकासकामे प्रगतीपथावर असून सिडको परिसरात मानवी आरोग्यास हानीकारक अशा प्रकारचा कचरा, बांधकामाचा राडारोडा, उत्खननातील दगडमाती टाकण्यास सक्त मनाई आहे. असे करतांना कोणी आढळल्यास सदर व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रिज टाकताना कोणी आढळल्यास सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेबसाइटवर तसेच संबंधित पोलिस ठाण्यास माहिती द्यावी, असे आवाहन सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

सकाळ मुंबई, सोमवार, ६ जानेवारी २०२५

# डेब्रिज टाकणारी १५० वाहने जप्त

## वर्षभरात नवी मुंबईत सिडकोची १६५ व्यक्तींवर कारवाई

नवी मुंबई, ता. ५ (वार्ताहर) : सिडकोच्या जागेवर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रिज टाकणाऱ्या तसेच मातीचे उत्खनन करून त्याची चोरी करणाऱ्यांविरोधात सिडकोने गत वर्षभरात कारवाई करून ५६ गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये १६५ आरोपींना अटक करून १५० ट्रक, डम्पर व तीन जेसीबी आणि पोकलेन जप्त केले आहे.

मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. येथील डेब्रिज काही व्यक्तींकडून सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जागेमध्ये तसेच त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये अनधिकृतपणे टाकण्यात येत आहे. मातीचे उत्खनन करून त्याचीदेखील चोरी करण्यात येते. या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक, अधिकारी व अभियंते, तसेच सुरक्षा अधिकारी व सुरक्षारक्षकांच्या पथकाने गत वर्षभरामध्ये विषेश मोहीम राबवून सिडकोने संपादित केलेल्या जागेवर डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली.



**नवी मुंबई :** सिडकोने डेब्रिज टाकणारे डम्पर जप्त केले आहेत.

### ५६ गुन्हे दाखल

सिडकोच्या जागेवर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात विविध पोलिस ठाण्यांत ५६ गुन्हे दाखल करून १६५ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये १५० ट्रक-डम्पर, तीन जेसीबी, पोकलेन आदी वाहनेदेखील जप्त करण्यात आली आहेत.

सिडको परिसरात मानवी आरोग्यास हानिकारक अशा प्रकारचा कचरा, बांधकामाचा राडारोडा, उत्खननातील दगडमाती टाकण्यास सक्त मनाई आहे. याबद्दल www.cidco.maharashrta.gov.in या वेबसाईटवर तसेच संबंधित पोलिस ठाण्यास माहिती द्यावी.

**- सुरेश मेंगडे,**
मुख्य दक्षता अधिकारी, सिडको

सोमवार, ६ जानेवारी २०२५ | मुंबई | प्रहार

# नवी मुंबई मनपा क्षेत्रातील भूमाफियांचे मोडणार कंबरडे

◆ नवी मुंबई (वार्ताहर) :

मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध बांधकामे चालू आहेत. तसेच शेकडो बांधकामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यावर सिडकोकडून नेहमीच कारवाई होतांना दिसते; परंतु तरीसुद्धा भूमाफिया थांबण्याचे नाव घेत नव्हते; परंतु आता सिडकोकडून अवैध बांधकाम निष्कासित केल्यावर त्या ठिकाणी पुन्हा बांधकाम होऊ

## सिडकोकडून साठपेक्षा जास्त भूखंडाना केले सुरक्षित

नये. यासाठी उपाययोजना केली जात आहे. यामुळे भूमाफियांचे कंबरडे मोडले असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अशाच प्रकारे मनपाकडून देखील कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नवी मुंबई मनपा क्षेत्रातील आठही विभाग कार्यालय क्षेत्रातील गावठाण व गावठाण विस्तार परिसरात अतिशय वेगाने बैठ्या चाळींवर पाच ते माळ्यांच्या बांधकामाचे सत्र मोठ्या प्रमाणात सुरू होते. यावर सिडकोकडून नियमित कारवाईचे सत्र देखील दिमाखाने चालू होते. परंतु एकदा कारवाई झाल्यावर पुन्हा सबंधित विभागाची पाठ फिरल्यावर पुन्हा अवैध इमारतीचे बांधकाम सुरू होत असे. यामुळे अवैध बांधकामावर कारवाई करून देखील फायदा होत नसे; परंतु आता सिडकोने गियर बदलला असून कारवाई झाल्यावर मोकळ्या झालेल्या त्या भूखंडाला लोखंडी पत्रा टाकून संरक्षित केला जात आहे. आतापर्यंत मागील दीड वर्षात ६५ ठिकाणी भूखंड सुरक्षित केले आहेत.

यापूर्वी सिडकोकडून शेकडो बांधकामावर कारवाई केली आहे. ही वस्तुस्थिती असताना देखील भूमाफिया साम, दंड, भेद या आयुधांचा वापर करत निष्कासित केलेल्या बांधकामावर अनधिकृत इमारतीचे इमले वाढत असत.




"सिडकोकडून निष्कासित केलेल्या भूखंडावर पुन्हा बांधकाम होऊ नये. यासाठी उपाययोजना केली जात आहे. जर निष्कासित केलेल्या भूखंडावर कुंपण कोणी तोडण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल.

– **सुरेश मेंगडे**, दक्षता अधिकारी, सिडको.

**लक्ष ठेवण्याची गरज :** सिडकोकडून बांधकाम निष्कासित केल्यावर त्या ठिकाणी संरक्षण लोखंडी कुंपण घालत आहे. ते कुंपण भूमाफिनी तोडू नये व पुन्हा बांधकाम काम होऊ नये. यासाठी सिडकोकडून लक्ष ठेवण्याची गरज भासत आहे. नाहीतर भूमाफिया ते कुंपण तोडू शकतात. त्यामुळे सिडकोकडून लक्ष ठेवण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**मनपाकडून प्रयत्न :** ज्या ठिकाणी अवैध बांधकाम होत आहे, त्या ठिकाणी नागरिकांची फसवणूक होऊ नये म्हणून त्या आशयाचा फलक लावणे अनिवार्य आहे. अशा प्रकारचा फलक मनपाकडून त्या अवैध बांधकामावर प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न साधारणतः दोन ते तीन वर्षांपूर्वी केला गेला होता; परंतु फलक लावल्यावर व मनपा कर्मचाऱ्यांची पाठ फिरल्यावर तत्काळ सबंधित भूमाफिया काढत होते. त्यामुळे अवैध इमारतीमध्ये सदनिका विकत घेणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होत होती. त्यामुळे मनपाकडून देखील सिडको सारखे प्रयत्नशील राहण्याची गरज व्यक्त होऊ लागली आहे.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, रविवार, ५ जानेवारी २०२५ नव शक्ति marathi.freepressjournal.in

### सिडकोमार्फत २ हजार १०२ अतिक्रमणविरोधी कारवाई

# वर्षभरात २ लाखांपेक्षा अधिक चौरस मीटर जमीन अतिक्रमणमुक्त

**नवी मुंबई :** सिडकोने सरत्या वर्षात तब्बल २ हजार १०२ अतिक्रमणविरोधी कारवाई केल्या आहेत. यात अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांचा समावेश असून या कारवाईसाठी प्रसंगी पोलीस सहाय्य घेण्यात आले आहे. वर्षभरात सिडकोने २ लाख ६ हजार ४३१ चौरस मीटर जमीन अतिक्रमणमुक्त केली आहे.

> यात वर्षात मोठ्या प्रमाणात जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आम्हाला यश आले आहे. या पुढेही आमच्या समोर आव्हाने असले तरी नियमबाह्य बांधकाम, अतिक्रमण कारवाईत सातत्य ठेवण्यात येईल.
> – सुरेश मेंगडे, (मुख्य सुरक्षा अधिकारी)

मुंबईवर पडणारा पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई वसवण्यात आली. यासाठी नवी मुंबई उरण पनवेल परिसरातील ९५ गावातील जमीन संपादित केली गेली. नवीन शहर बनवण्यासाठी नियोजनकार म्हणून सिडकोची स्थापना १९६६ ला करण्यात आली. शहर वसवल्यानंतर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात होत असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभाग काम करीत असून २०२४ या वर्षात एकूण २ हजार १०२ अतिक्रमणविरोधी कारवाई करीत २ लाख ६ हजार ४३१ चौरस मीटर जमीन अतिक्रमण मुक्त करण्यात सिडकोला यश आले आहे. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी म्हणून सुरेश मेंगडे हे




कार्यरत असून यांच्या नेतृत्वाखाली मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे, ९ नियंत्रक व सुमारे २० भूमापक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व ३५ पोलीस अधिकारी-कर्मचारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी व २३ सुरक्षा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १७ सुरक्षा कर्मचारी, कार्यकारी अभियंता व स्थापत्य अभियंते असे मनुष्यबळ कार्यरत आहे.

| अतिक्रमण | अनधिकृत बांधकाम कारवाई |
|---|---|
| अनधिकृत बांधकाम धारकांना दिलेल्या नोटीस | २,९६० |
| निष्कासन मोहीम | ५४७ |
| यशस्वी मोहीम | ३०२ |
| निष्कासित करण्यात आलेली बांधकामे | २,१०२ |
| अतिक्रमण मुक्त केलेले जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | २,०६,४३१ |

सिडको क्षेत्रात आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई-नवी मुंबईला जोडणारा अटल सागरी सेतु, जेएनपीटी, देशातील सर्वात व्यस्त असणारा शीव-पनवेल महामार्ग असे प्रकल्प आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नजरेच्या टप्प्यात असणारी पारगाव येथील एका टेकडीवर असणारा वादग्रस्त दर्गावरील कारवाई, तसेच वर्षभरात धार्मिक स्थळांचे अतिक्रमण थांबविणे यावर नियंत्रण ही मोठी कामगिरी असल्याचा दावा केला जात आहे. जमिनीचे भाव गगनाला भिडले असून आगामी काळात त्यात कैकपटीने वाढ होण्याची शक्यता आहे. राजकीय वरदहस्त असणारे भूमाफिया रोखणे तसेच न्यायालयीन प्रक्रियेत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणे, हे मोठे आव्हान सिडको समोर आहे.



पुण्य नगरी www.epunyanagari.com | ठाणे | रविवार, ५ जानेवारी २०२५

# डेब्रिज माफियांवर सिडकोची कारवाई

## वर्षभरात १६५ जणांवर कारवाई, ५६ गुन्हे दाखल, १५० हून अधिक वाहने जप्त

। नवी मुंबई : सिडकोच्या जागेवर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रीज टाकणाऱ्या तसेच नैसर्गिक मातीचे उत्खनन करून त्याची चोरी करणाऱ्याविरोधात देखील सिडकोने गेल्या वर्षभरात धडक कारवाई करून एकुण ५६ गुन्हे दाखल केले आहेत. यासोबतच १६५ दोषींना अटक करून घटनास्थळावरून १५० ट्रक-डंपर्स व ३ जेसीबी आणि पोकलन अशी वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती सिडकोचे मुख्य दक्षता आधिकारी सुरेश मेंगडे यांनी दिली आहे.



मुंबईसह आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. या कामाच्या ठिकाणावरून निघणारे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रीज काही व्यक्तींकडून सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जागेमध्ये तसेच त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये टाकण्यात येत आहे. तसेच काही व्यक्तींकडून नैसर्गिक मातीचे उत्खनन करून त्याची देखील चोरी केली जात आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली अनधिकृत बांधकाम विभागाने कारवाई सुरू केली होती.

> “ सिडकोच्या परिक्षेत्रात विकासकामे प्रगतीपथावर असून, सिडकोच्या जागेत मानवी आरोग्यास हानीकारक असलेला कचरा, बांधकामाचा राडारोडा, उत्खननातील दगड-माती टाकण्यास सक्त मनाई आहे. असे करतांना कोणी आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांना सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रीज टाकताना कोणी आढळल्यास त्यांनी सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेबसाईटवर तसेच संबंधित पोलीस ठाण्यास माहिती द्यावी. – **सुरेश मेंगडे (मुख्य दक्षता अधिकारी सिडको)**

त्यानुसार सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाचे अभियंते, अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक, अधिकारी व अभियंते तसेच सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षकांच्या पथकाने गेल्या वर्षभरात विषेश मोहीम राबवून सिडकोच्या जागेवर डेब्रीज टाकणाऱ्याविरोधात धडक कारवाई केली. या विशेष मोहिमेदरम्यान सिडकोच्या जागेवर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्या ५६ जणांवर नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करून या प्रकरणात १६५ दोषींवर कारवाई केली आहे. या कारवायांमध्ये सिडकोने १५० ट्रक-डंपर, ३ जेसीबी, पोकलन आदी वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

Sunday Hindustan Times

MUMBAI
**SUNDAY, JANUARY 05, 2025**

## Savitrimai Phule Jayanti celebrated at CIDCO with enthusiasm



Savitrimai Phule Jayanti, organized by CIDCO B. C. Employees Association was celebrated at CIDCO Bhawan on 03rd January, 2025. For this program, the activist Dr. Kavita Ware was present as the chief speaker and guided the attendees on the topic “Life journey of Savitribai and today’s women emancipation”. On this occasion Shri. Suresh Mengade, Chief Vigilance Officer, CIDCO was present as the chief guest. Smt. Anupama Karnam, Additional Chief Planner, CIDCO was present as the president of the programme. Also, Shri. Sanjay Patil, Chairman, CIDCO Employees Union, Shri. Narendra Hire, Chairman, CIDCO B. C. Employees Association, Shri. Nitin Kamble, General Secretary, CIDCO B. C. Employees Association along with head of departments, officers and employees of CIDCO were present.The program was commenced with the lighting of lamp and by offering garland to Savitrimai’s image by dignitaries. The dignitaries were felicitated with a plant as a symbol of ideology and the book “Ambdekari Aai”. On the occasion of Savitri Mai Phule Jayanti, a commendable initiative is being taken to honour the accomplished women inside and outside the CIDCO Corporation with a special award called “Savitrichya Leki”. This year’s “Savitrichya Leki” award was presented to Smt. Priya K., Additional Chief Planner, CIDCO and Smt. Dr. Bindu Murlidharan, Transportation Engineer (Airport, Railway and Special Project).

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

सकाळ नवी मुंबई+पनवेल
मुंबई, रविवार, ५ जानेवारी २०२५ ३

# ५२ एकर जमीन अतिक्रमणमुक्त

## सिडकोकडून वर्षभरात नवी मुंबईतील दोन हजार बेकायदा बांधकामे उद्ध्वस्त

नवी मुंबई, ता. ४ (बातमीदार) : अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे करून सिडकोची जागा हडप करणाऱ्या भूमाफिया व बांधकाम विकासकांसाठी सिडकोचा अतिक्रमण नियंत्रण विभाग कर्दनकाळ ठरला आहे. गत वर्षभरात अतिक्रमण नियंत्रण विभागाने तब्बल दोन हजार १०२ अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर बुलडोझर चढवून सिडकोची एकूण दोन लाख सहा हजार ४३१ चौरस मीटर जमीन (सुमारे ५२ एकर) अतिक्रमणमुक्त करण्यात यश मिळवले आहे. अतिक्रमणमुक्त झालेल्या या जमिनीचे बाजारमूल्य २,५०० कोटींपेक्षा जास्त असल्याची माहिती सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिली.

सिडकोच्या इतिहासात पहिल्यांदाच एका वर्षात (जानेवारी ते डिसेंबर २०२४ दरम्यान) एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई झाली आहे. गत वर्षभरात सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणधारकांना दोन हजार १६० नोटिसा बजावल्या होत्या तसेच अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी ५४७ मोहिमांचे नियोजन केले होते. त्यापैकी बांधकाम पाडण्याच्या ३०२ मोहिमा यशस्वी झाल्या. या मोहिमांतर्गत सिडकोच्या जमिनीवर अनधिकृतरीत्या उभारण्यात आलेली आरसीसी बांधकामे, कच्ची बांधकामे, टपऱ्या, झोपड्या आदी दोन हजार १०२ बांधकामे उद्ध्वस्त करण्यात आली. या कारवाईअंतर्गत सिडकोची दोन लाख सहा हजार ४३१ चौरस मीटर जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात सिडकोच्या दक्षता विभागास यश आले आहे. दरम्यान, दक्षता विभागाकडून अतिक्रमणमुक्त करण्यात आलेल्या जमिनीचे योग्य नियोजन करून या जमिनी निविदेद्वारे विविध भूखंडांच्या स्वरूपात विक्रीस उपलब्ध करून देण्याचा सिडकोचा मानस आहे. त्यामुळे या अतिक्रमणमुक्त जमिनींच्या माध्यमातून सिडकोच्या तिजोरीत हजारो कोटी रुपये येणार आहेत.



नवी मुंबई : सिडकोने वर्षभरात मोठमोठी अनधिकृत बांधकामे पाडली.

### विभागाचे मनुष्यबळ

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या अधिपत्याखाली अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग कार्यरत आहे. या विभागामध्ये मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई व नैना), नऊ नियंत्रक अनधिकृत बांधकामे व सुमारे २० भूमापक, वरिष्ठ पोलिस निरीक्षक व ३५ पोलिस अधिकारी-कर्मचारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी व २३ सुरक्षा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १७ सुरक्षा कर्मचारी, कार्यकारी अभियंता (अनधिकृत बांधकामे) व स्थापत्य अभियंते असे मनुष्यबळ कार्यरत आहे.

### वर्षभरातील सिडकोची मोहीम

| | |
|---|---|
| उद्ध्वस्त केलेली बांधकामे | २,१०२ |
| बजावलेल्या नोटिसा | २,१६० |
| बांधकाम पाडण्याच्या नियोजित मोहिमा | ५४७ |
| बांधकाम पाडण्याच्या यशस्वी मोहिमा | ३०२ |
| अतिक्रमणमुक्त क्षेत्रफळ | २,०६,४३१ चौ.मी. |
| अतिक्रमणमुक्त क्षेत्रफळाची रक्कम | २,५०० कोटी |

नवी मुंबई एक सुनियोजित शहर असून, या शहराची अनिर्बंध वाढ रोखणे हे सिडकोचे प्रमुख कर्तव्य आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोने नेहमीच कठोर पावले उचलली आहेत. त्याअंतर्गतच सध्या सिडकोतर्फे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई सुरू आहे. भविष्यातदेखील अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्यात येईल.
- विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको

२०२४मध्ये पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या कालावधीत बहुतांश अधिकारी-कर्मचारी व पोलिस दल निवडणूक कामकाजाकरिता नियुक्त करण्यात आले होते. अशा परिस्थितीतही मर्यादित उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे व कायदेशीर नोटिसा बजावून व जमिनीच्या कागदपत्रांची तपासणी करून अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली.
- सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको

